सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग,निर्णय क्रमांक: एपीओ -२६२५/ प्र.क्र.८५/ पोल -३, दिनांक २८ जूलै, २०२५

**विषय** :- पोलीस अधीक्षक,नागपूर ग्रामीण यांचे कार्यक्षेत्रातील पोलीस ठाणे, खापरखेड हे पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या कार्यक्षेत्रात संध्याच्या मंजूर ५६ पदांसह समाविष्ट करणेबाबत.

********

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन परिपत्रक क्रमांक वशिअ-११२५/प्र.क्र.३९/विचौ-१, दिनांक-२८ जुलै, २०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०७२८१६५८२६९९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 02-08-2025 10:08:56
( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक (नि.व स.), महाराष्ट्र राज्य,मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक (नि.व स.), महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (नि.व स.),महाराष्ट्र राज्य,मुंबई.
पोलीस आयुक्त, नागपूर.
पोलीस अधीक्षक, नागपूर (ग्रामीण).
कार्यासन क्रमांक. २६-अ.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे कार्यक्षेत्रातील पोलीस ठाणे, खापरखेडा हे पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या कार्यक्षेत्रात सध्याच्या मंजूर ५६ पदांसह समाविष्ट करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः एपीओ-२६२५/प्र.क्र.८५/पोल-३**

मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई

दिनांक : २८ जुलै, २०२५.

**संदर्भ :-**

१.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/पो.ठा. खापरखेडा/नागपूर शहर/८४/२०२५, दि.०५.०५.२०२५.

२.उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक १४.०७.२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे दि.१७.०७.२०२५ रोजीचे कार्यवृत्त.

**प्रस्तावना :-**

नागपूर शहराच्या उत्तर दिशेला पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर यांची हद्द कोराडीपर्यंत आहे. कोराडी येथे औष्णिक विद्युत केंद्र असून तिथे मोठ्या प्रमाणात कामगार कार्यरत आहे. कोराडी येथे विभिन्न निमसरकारी तसेच खाजगी संस्थेमध्ये कामगार म्हणून कार्यरत असलेले नागरिक नागपूर शहराच्या लगत खापरखेडा येथे वास्तव्यास आहेत, तथापि, खापरखेडा हे क्षेत्र पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत नसून ते पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रात येते. त्यामुळे कामाच्या ठिकाणी घडलेल्या गुन्ह्यासंबंधीत तपास करतांना कार्यक्षेत्रामध्ये बदल होत असल्याने गुन्ह्यांचा तपासामध्ये अथवा फरार आरोपी शोधतांना मोठी अडचण जाणवते. खापरखेडा पोलीस ठाणे हे नागपूर शहराला लागत असल्याने तसेच गुन्ह्यासंबंधीत प्रशासकीय अडचणी सोडविण्याच्या उद्देशाने खापरखेडा पोलीस ठाणे हे मंजूर संख्याबळासह, कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार तसेच संपूर्ण इमारत सर्व साहित्यासह पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर मध्ये समाविष्ट करणे गरजेचे आहे.

त्यानुपंगाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाने संदर्भाधीन क्र.१ येथे नमूद पत्रांद्वारे पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे कार्यक्षेत्रातील पोलीस ठाणे, खापरखेडा हे पोलीस ठाणे पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट करणेबाबत प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदरहू प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय</u>:-**

पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे कार्यक्षेत्रातील पोलीस ठाणे, खापरखेडा हे पोलीस ठाणे पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या कार्यक्षेत्रात सध्याच्या मंजूर ५६ पदांसह समाविष्ट करणेबाबत शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. उक्त शासन निर्णय हा संदर्भीय क्र.२ येथील मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०७२८१६५८२६९९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2025.07.28 16:59:23 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, गृह विभाग**

**प्रत,**

मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (विशेप), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, नागपूर शहर.
पोलीस अधीक्षक, नागपूर (ग्रामीण).
अधिदान व लेखा अधिकारी, नागपूर.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.
जिल्हा कोपागार अधिकारी, नागपूर.
उप सचिव(पोल ३),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
निवड नस्ती, पोल-३.